नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 07/01/2022 (शुक्रवार)
(दुपार)

---

## चोरी

पो.स्टे. एमआयडीसी बोरी :– अंतर्गत यंश इटरप्रायजेस कंपनी बोरी येथे दिनांक 02/01/2022 चे 17.30 वा. ते दिनांक 03/01/2022 चे 17.30 वा. दरम्यान आरोपीने कंपनीतील सिसिटीव्ही. कॅमेरा बंद करून कंपनीतील ठेवलेले सिलींग पॅनल 11 बॉक्स 4000 मिमि लांबीचे 200 मिटर कॅरीअर 200 मिटर एग्ल 1 बॉक्स जॉईन सप्लाय असा अंदाजे 85,000/–रू. चा माल व 1 किलीपान बर कॉईल 610 मिमि जाडीचा अंदाजे वजनी 2500 किलो कि. 1,00,000/–रू. असा असुन एकुण 1,85,000/–रू. चा मुददेमाल चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– अरविंद पुरूषोत्तम झाडे, वय 40 वर्ष, रा. बोरी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे आरोपीविरुध्द कलम 381 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि कलेगुरवार मो.क्र. 9175579193 हे करीत आहे.

## दुखापत

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत किन्ही येथे दिनांक 05/01/2022 चे 19.30 वा. ते 20.00 वा. दरम्यान आरोपी नामे– दिलीप कृष्णाराव साळवे, वय 45 वर्ष, रा. किन्ही याने फिर्यादी नामे– बंटी दिलीप साळवे, वय 25 वर्ष, रा. किन्ही याला 'हे माझे घर आहे व घरटॅक्स पावती माझ्या नावाने असुन तुम्ही घराच्या बाहेर निघुन जा' असे म्हणुन फिर्यादी च्या हाताचे करंगळी ला दाताने चावा घेतला. फिर्यादीच्या आई ने मध्यस्थी केली असता, तिच्या सुध्दा तळहाताचा दाताने आरोपीने चावा घेतला व घराच्या बाहेर निघा नाहीतर तुमचे सर्व सामान फेकुन देतो अशी धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीला सुचनापत्रावर सोडण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस हवालदार मधुकर सुरपाम मो.क्र. 9764715658 हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. खापरखेडा :– अंतर्गत 5 कि मी अंतरावर दहेगाव येथे दिनांक 05/01/2022 चे 12.35 वा. ते 18.30 वा. दरम्यान आरोपी नामे– मंजीत सिंग याने फिर्यादीस 40 किलो पनीर पाहीजे असे सांगुन फिर्यादी नामे– रूपेश रविन्द्र चिचमलातपुरे, वय 35 वर्ष, रा. वार्ड क्र. 4, दहेगाव रंगारी याला आरोपीने क्यूआर कोड पाठवुन 'त्यावर पेमेन्ट केल्यास तुम्हाला तुमचा अकाउन्ट मध्ये डबल पैसे जमा होतील' असे सांगून आरोपीने पाठविलेल्या क्यूआर कोड द्वारे फिर्यादी ने 1,55,382/–रू. ऑनलाईन पेमेन्ट द्वारे 24,999/–रू. असे एकुण कि. 1,80,381/–रू. ची फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम 420 भादंवि. सहकलम 66 (5) माहिती तंत्रज्ञान कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलिस निरीक्षक श्री हदयनारायण यादव मो क्र 9823918486 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर